# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१३ – १४

### **राष्ट्रीय सेवा योजना विभाग**

केसरी पुणे, ३० जानेवारी २०१४/४

## मतदार दिनानिमित्त राजगुरुनगरमध्ये जनजागरण रॅली



राष्ट्रीय मतदार दिनानिमित्ताने राजगुरुनगर शहरातून राष्ट्रीय सेवा योजनेच्या दोनशे विद्यार्थ्यांनी जनजागरण रॅली काढली. या रॅलीची सुरुवात करताना प्रांताधिकारी खराडे व इतर.

**राजगुरुनगर, (वार्ताहर) :** राष्ट्रीय मतदार दिनानिमित्ताने राजगुरुनगर शहरातून राष्ट्रीय सेवा योजनेच्या दोनशे विद्यार्थ्यांनी जनजागरण रॅली काढली.

राष्ट्रीय मतदार दिनाच्या निमित्ताने बुधवारी राजगुरुनगर शहरातून जनजागृती रॅली काढण्यात आली. या रॅलीदरम्यान मतदारांना मतदार ओळखपत्राचे वाटप करण्यात आले. या रॅलीची सुरुवात राजगुरुनगर येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातून करण्यात आली. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे सुमारे दोनशे महाविद्यालयीन विद्यार्थी सहभागी झाले होते. रॅलीचे उद्घाटन खेड विभागाचे उपविभागीय अधिकारी (प्रांत) हिम्मतराव खराडे यांच्या हस्ते झाले.

यावेळी तहसीलदार प्रशांत आवटे, नायब तहसीलदार माणिकराजे निंबाळकर, निवडणूक नायब तहसीलदार लतादेवी वाजे, स्मिता जोशी, हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाचे प्राचार्य पाटील, उपप्राचार्या खेडकर, तलाठी चोरमोले, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी दिलीप मुळूक आदी उपस्थित होते.

यावेळी प्रांताधिकारी खराडे म्हणाले, युवकांनी मतदार नोंदणी वेळेत करावी मतदानाचा हक्क बजवावा. कोणत्याही प्रलोभनाला बळी पडू नये.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख